
# कोसलराज पसेनदि

## (कोशलराज प्रसेनजित)

मराठी



विपश्यना विशोधन विन्यास

# कोसलराज पसेनदि

(कोशलराज प्रसेनजित)

हिन्दी पुस्तकाचा मराठी अनुवाद

**विपश्यना विशोधन विन्यास**

धम्मगिरी, इगतपुरी

# कोशलराज प्रसेनजित

पुस्तक कोडः **M52**

© विपश्यना विशोधन विन्यास
सर्वाधिकार सुरक्षित

प्रथम आवृत्ती : एप्रिल 2025

**मूल्यः ₹ /-**

**Price: Rs.**

**ISBN** 978-81-7414-495-9

**प्रकाशकः**

**विपश्यना विशोधन विन्यास**

धम्मगिरी, इगतपुरी - ४२२४०३

जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र

फोन: ०२५५३-२४४९९८, २४३५५३, २४४०७६, २४४०८६,
८४८४८३४८३७, ८४८४८३७८३५,
८४८४८३९८३७, ८४८४८३१८३५,

Email: vri_admin@vridhamma.org

Website: www.vridhamma.org

**मुद्रकः**

**अपोलो प्रिंटिंग प्रेस**

२५९, सीकॉफ लिमिटेड, ६९ एम. आय. डी. सी.,

सातपुर, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र

# कोशलराज प्रसेनजित

## विषयानुक्रमणिका

प्रकाशकीय ............................................ 7

**अध्याय-१ ...........................................13**

कोशल राजवंश : परिचय.......................... 13

प्रसेनजित................................................ 13

देवी मल्लिका ........................................... 14

वासभखत्तिया ........................................... 14

सोमा आणि सुकुला .................................. 14

विट्टूभ..................................................... 14

सुमना..................................................... 15

बावरी...................................................... 15

**अध्याय - २ ........................................16**

शंकेखोर प्रसेनजित ................................ 16

भिक्षुसंघाची उपेक्षा.................................. 16

काय बुद्ध सर्वज्ञ आहेत? ........................... 19

बुद्ध आणि निंदित कर्म!............................ 20

प्रियमुळे उत्पन्न होतात शोक, दु:ख.... ..... 22

वय पाहू नका भिक्षूचे............................... 25

**अध्याय-३ ........................................28**

प्रसेनजितचे प्रश्न.................................... 28

पुद्गल (मनुष्या) चे चार प्रकार – ................ 28

श्रेष्ठ वर्ण कोणता?................................... 30

आवडत्या गोष्टींवर प्रेम ............................ 31

निर्लोभी किती?...................................... 32

कोणाला दान देण्याने महाफळ?............... 32

कोणाचे स्वत:वर प्रेम?............................ 34

आपला रक्षक कोण?............................... 35

तीन अहितकारी धर्म ............................... 36

अप्रमादाचे गुण....................................... 36

संत धर्म जुना होत नाही .......................... 37

अव्याकृत का?....................................... 37

काय देव मानव-लोकात जन्म घेतात?...... 39

**अध्याय - ४ ........................................41**

कोशलराजला उपदेश ............................. 41

सम्यक आहार ....................................... 41

सम्यक विहार........................................ 43

पुत्री-महिमा .......................................... 44

चकाकणारे सारे काही सोने नसते........... 45

कंजूष’ व्यक्तीची गती.............................. 46

शेठ, पुण्य कमवा! .................................. 48

संतांशी कपट नाही ................................ 49

घडा फुटणारच आहे ................................ 52

मृत्यू विरुद्ध धर्माचरण ............................ 53
**अध्याय - ५ ........................................55**
धर्माची सुधर्मता...................................... 55
बंधन जाणा............................................ 55
सर्वांविषयी निर्वेद.................................. 56
पाच गोष्टी अप्राप्य ................................. 57
कुटिल वचन साधू सहन करतो................ 59
भिक्षूद्वारे स्थान परिवर्तन......................... 61
नियमात सुधारणा................................... 62
स्थविराकडून चूक ................................. 63
भिक्षुणीला गर्भ ....................................... 64
साधु साधु ...चा गंध ............................... 65
दुसरे कोणी प्रिय नाही ............................ 67
श्रद्धाळू देवी मल्लिका ............................. 67
बुद्ध आणि त्यांची कांती........................... 69
भगवानांचा गौरव.................................. 70
प्रशंसितांचे प्रशंसित................................ 71
धर्माची सुधर्मता...................................... 72
**अध्याय - ६ ........................................74**
राजा प्रसेनजित ..................................... 74
शाक्य-कुळात विवाह.............................. 74
श्रेष्ठीला आपल्या राज्यात वसविणे........... 77
न्यायालयातील खोटेपण ....................... 78
दोषयुक्त सत्कार.................................... 78

दु:खाची रात्र .......................................... 79
निधी अर्जन .......................................... 80
भिक्षुणी-निवास .......................................... 80
कस्सपचे पालन-पोषण .......................................... 82
पुरोहित-पुत्र बावरी .......................................... 83
पाण्यात हसणे-खेळणे नाही .......................................... 84
महामात्यला ज्ञान .......................................... 85
सुखाची झोप .......................................... 85

**अध्याय - ७ .......................................... 87**

तृष्णे! तू गेली नाहीस .......................................... 87
दु:स्वप्न आणि तीन भय .......................................... 87
सुख-शांतीची हत्या .......................................... 92
दोन गज जमीनही मिळाली नाही .......................................... 94
जसे करावे तसे भरावे .......................................... 95

**अध्याय - ८ .......................................... 98**

उपासक प्रसेनजित .......................................... 98
जो जाणेल तो आनंदी .......................................... 98
धर्म खूप बलवान .......................................... 100
धर्म-कायेचा सत्कार .......................................... 102

**विपश्यना साधना केंद्र .......................................... 104**

# प्रकाशकीय

बुद्धकालीन भारतातील गणराज्यांमध्ये दोन शक्तीशाली राजघराणी होती, एक मगध आणि दुसरी कोशल. मगधचा राजा बिंबिसार आणि कोशलचा राजा प्रसेनजित हे दोघे एकमेकांचे नातलग होते आणि मित्र ही होते. दोघेही भगवान बुद्धांचे उपासक होते, परंतु भगवानांच्या विषयी बिंबिसारला आधीपासूनच जितका समर्पणाचा भाव होता, तितका प्रसेनजितमध्ये नव्हता. हो! प्रसेनजितची आत्या देवी सुमना, तिला अर्हत्व अवस्था प्राप्त झाली होती आणि त्याची राणी, देवी मल्लिकाची भगवानांवर अतूट श्रद्धा होती. देवी मल्लिकाचा प्रभाव आणि प्रयत्नांमुळे महाराज प्रसेनजितही हळूहळू बुद्ध, धर्म आणि संघाच्या बरेच जवळ आले.

एकदा एका रात्री राजा प्रसेनजितने सोळा भयानक स्वप्ने पाहिली. जेव्हा त्यांनी आपल्या पुरोहितांना स्वप्नांसंबंधी सांगितले, तेव्हा पुरोहित म्हणाले– 'महाराज, ही स्वप्ने आपल्यासाठी आणि आपल्या राज्यासाठी खूप घातक आहेत. त्यांच्यापासून रक्षण करण्यासाठी, आपल्याला यज्ञ करावा लागेल.' त्या काळी यज्ञात गायी, बैल, वासरे, बकऱ्या, मेंढ्या इत्यादी पशूंची हत्या केली जात असे. जेव्हा ही हिंसक यज्ञाची गोष्ट देवी मल्लिकाला कळली, तेव्हा तिने राजाला विचारले. स्वप्नाची गोष्ट समजल्यावर तिने विचारले, 'महाराज! आपण विश्वातील सर्वात महान ब्राह्मणाकडे गेला नाहीत? राजाने विचारले– 'ते कोण आहेत?' मल्लिका म्हणाली– 'महाराज! सम्यक संबुद्ध.' त्यानंतर ती राजाला भगवानांकडे घेऊन गेली. भगवानांनी सर्व स्वप्नांचे स्पष्टीकरण देताना सांगितले– 'महाराज! आपल्याला किंवा आपल्या राज्याला यांच्यापासून कोणतेच भय नाही. पुरोहिताने लोभापोटी यज्ञ करण्यास सांगितले आहे.' तिथून परत आल्यावर मल्लिकाने सगळ्या पशूंना सोडून दिले. जनता राणी मल्लिकाचा जय जयकार करु लागली.

श्रावस्तीत राहणारा श्रेष्ठी अनाथपिंडिक आणि उपासिका विशाखाने जेतवनाराम आणि पूर्वाराम हे विहार बनवून संघाला दान दिले, जिथे हजारो भिक्षू विहार करीत असत. राजाला जेव्हा समजले की दररोज दोन हजार भिक्षू अनाथपिंडिक, विशाखा तसेच इतर महत्वपूर्ण कुळांमध्ये भोजन करतात तेव्हा त्यानेही भगवानांना सांगून दररोज पाचशे भिक्षूंना भोजनदानासाठी आमंत्रित केले. परंतु, सुयोग्य व्यवस्थेच्या अभावी एका आठवड्यानंतर भिक्षूंनी तिथे जाणे बंद केले. राजाने त्याविषयी विचारणा केल्यानंतर भगवानांनी सांगितले की श्रद्धा आणि विश्वासाच्या कमतरतेमुळे असे झाले.

आपल्याविषयी भिक्षूंचा विश्वास जिंकण्यासाठी अमात्यांच्या सल्ल्यावरुन राजाने शाक्य कुमारीशी विवाह करण्याचा प्रस्ताव मांडला. आपल्या जातीच्या अभिमानाने प्रेरीत शाक्यांनी कपटाने दासीपुत्री वासभखत्तियाचा राजाशी विवाह करुन दिला. त्यांना एक मुलगा झाला, ज्याचे नाव विटटूभ ठेवले. तो पंधरा-सोळा वर्षांचा झाल्यावर आपल्या आजोळी कपिलवस्तुला गेला. तिथून परतताना, त्याला समजले की तो दासी-पुत्रीचा मुलगा असल्यामुळे त्याचे आसन दुधाने धुतले गेले. त्याच क्षणी त्याने राजा झाल्यावर तेच आसन रक्ताने धुण्याची प्रतिज्ञा केली. राजा झाल्यावर पहिले काम त्याने केले ते म्हणजे शाक्यांवर आक्रमण. आबालवृद्ध, स्त्रिया, सर्वांना ठार मारले. तिथून परत येत असताना, तो सेनेसह नदीच्या किनाऱ्यावर विश्रांती घेत होता. अचानक नदीला पूर आला. विटटूभसह सारे सैन्य समुद्रात वाहून गेले. भगवान म्हणाले– 'दोघांनाही आपल्या पूर्व-जन्मातील कर्मांचे फळ मिळाले.'

एके दिवशी श्रावस्तीमधील एका वैश्य परिवारातील एकुलत्या एक मुलाचा मृत्यू झाला. त्याचे वडील भगवानांजवळ गेले आणि त्यांना त्यांनी आपले दु:ख ऐकवले. भगवानांनी म्हटले– 'उपासका! जे प्रिय आहे त्याने दु:खच प्राप्त होते.' भगवानांचे हे कथन मृताचे वडील इतरांना सांगत सुटले. ही गोष्ट राजाला समजल्यानंतर त्याने ती उपहासाच्या रूपात मल्लिकाला सांगितली. पण जेव्हा राणीने निरनिराळी उदाहरणे देऊन भगवानांच्या या कथनातील सत्यता पुष्ट केली, तेव्हा श्रद्धेने

भगवानांचे नाव घेऊन नमस्कार करत राजाने मान्य केले आणि म्हटले– ‘असे वाटते की भगवान प्रज्ञेने भेदून-भेदून हे सारे काही पाहतात.’

एके दिवशी भगवानांजवळ बसलेल्या राजाने म्हटले– ‘भंते! हा संसार विभिन्न प्रकारच्या लोकांनी भरलेला आहे– उच्चकुलीन-कुलहीन, धनी-निर्धन, सुरूप-कुरूप, सदाचारी-दुराचारी इत्यादी. भगवान म्हणाले– ‘महाराज! आचरणाच्या आधारे संपूर्ण विभन्नतेना चार प्रकारात विभागू शकतो. ते आहेत– तम-तम परायण (अंधारातून अंधाराकडे जाणारे), तम-ज्योति परायण (अंधारातून प्रकाशाकडे जाणारे), ज्योति-तम परायण (प्रकाशातून अंधाराकडे जाणारे) आणि ज्योति-ज्योति परायण (प्रकाशातून प्रकाशाकडे जाणारे)’. असे सांगून भगवानांनी याचे विवेचन करुन समजाविले. राजाने विचारल्यावर भगवानांनी सांगितले की शील संपन्न व्यक्तीला दान देण्याने महाफळ प्राप्त होते.

जेव्हा राजाने विचारले– ‘भंते! तीन अहितकारी धर्म कोणते आहेत?’ तेव्हा भगवानांनी सांगितले– ‘आसक्ती, द्वेष आणि मोह’. हे महाकष्टकारी आणि दु:खदायी आहेत. ज्याचा आपल्या कायेवर, वाचेवर आणि मनावर संयम आहे, तोच सुरक्षित आहे. जो आपल्या कायेने, वाचेने आणि मनाने सदाचार करतो त्याचे आपल्या स्वत:वर प्रेम आहे.’

एकदा महाराज तीन-चार दिवसांनंतर भगवानांच्या सेवेसाठी आले. त्यांनी सांगितले की एका कंजूष माणसाच्या मृत्यूनंतर त्याची संपत्ती सरकारी खजिन्यात जमा करत आहे. – ‘भंते, इतक्या मोठ्या संपत्तीचा मालक असूनही तो कधी नीट खातही नव्हता.’ भगवान म्हणाले– ‘महाराज! कंजूष व्यक्ती स्वत:ही खात नाही आणि परिवारातील लोकांनाही खाऊ देत नाही, तो कधी दान दक्षिणाही देत नाही. त्याचे धन प्रेतांच्या विहिरीप्रमाणे असते, जिथले पाणी मनुष्य, पशू, पक्षी, कोणीही पिऊ शकत नाही.’

राजा प्रसेनजितने भिक्षुणीच्या मुलाचे पालन पोषण केले आणि नंतर त्याला प्रव्रजितही करविले. स्थविरी उप्पलवण्णावर बलात्कार झाल्यानंतर भगवानांनी सांगितल्याप्रमाणे राजाने नगरात भिक्षुणी विहार बनविला,

ज्यामुळे भिक्षुणी सुरक्षित झाल्या.

एकदा महाराज राणीसोबत गप्पा-गोष्टी करीत होते. राजाने विचारले– 'मल्लिका! काय तुला स्वत: पेक्षा इतर कोणी अधिक प्रिय आहे का? राणीने उत्तर दिले– 'नाही'. राणीने तोच प्रश्न राजाला विचारला. राजानेही तेच उत्तर दिले. तेव्हा दोघे भगवानांजवळ गेले आणि आपला अनुभव त्यांना सांगितला. दोघांच्या उद्गारांचे अनुमोदन करुन भगवानांनी त्यांना आशिर्वाद दिला.

महाराजांच्या जीवनकाळातच राणी मल्लिकाचा देहांत झाला. तिच्या देहांताचा समाचार ऐकताक्षणी राजाचा चेहरा एकदम निस्तेज झाला. राजाला दु:खी पाहून भगवानांनी त्याला समजावत म्हटले– 'महाराज! व्याधी, वृद्धावस्था, मृत्यू, क्षय आणि नाश या पाच गोष्टींपासून लोकात कोणताही प्राणी वाचला नाही. त्यासाठी दु:खी होण्यात आपलीच हानी आहे.'

डाकू अंगुलिमालचे दमन करण्यासाठी जाताना राजा भगवानांकडे गेला. तेथे अंगुलिमालला सुधारलेल्या रूपात पाहून राजाच्या आर्श्चयाला सीमा राहिली नाही. तो म्हणाला– 'भगवान कसे असंयमींना संयमी आणि अशांतांना शांत करतात?'

महाराज प्रसेनजितने तैर्थिकांकडून लाच घेऊन जेतवनाजवळ तैर्थिकाराम बनविण्याची अनुमती दिली. ते थांबविण्यासाठी भगवानांनी पाळीपाळीने आयुष्मान आनंद आणि अग्रश्रावक सारिपुत्र तसेच महामोग्गल्लानला पाठविले. राजा त्यांना भेटला नाही. हे समजल्यानंतर भगवानांच्या मुखातून हे शब्द बाहेर पडले– 'त्याला आपल्या राज्यात मरण्यासाठीही स्थान मिळणार नाही.'

एकदा कोशल नरेश भगवानांना भेटायला गेला. त्यांच्या चरणांवर डोके ठेवून नमस्कार केला, त्यांच्या चरणांची चुंबने घेऊ लागला आणि म्हणाला– 'भंते मी प्रसेनजित आहे.' त्याने भगवानांविषयी खूप श्रद्धा आणि आदर व्यक्त केला. 'भगवान! आपण सम्यक संबुद्ध आहात, आपण आपला धर्म चांगल्या प्रकारे आख्यात केलेला आहे'....

कुशीनाराचा मल्लकुमार बंधुल प्रसेनजितचा गुरुबंधू होता. राजाने

त्याला आपला सेनापती केले. त्याची कर्मठता पाहून नंतर त्याला न्यायाधीशही बनवले. त्यामुळे लाचखोर न्यायाधिशांची कमाई बंद झाली. त्यांनी एक षडयंत्र रचले की बंधुल कोशल राज्यावर अधिकार मिळवू इच्छित आहे. राजाचा या गोष्टीवर विश्वास बसला. त्याने कपटाने बंधुलसह त्याच्या पुत्रांची हत्या केली. परंतु नंतर बंधुलच्या पत्नीचा क्षमाभाव पाहून, राजाची सुख-शांती भंग पावली. आपल्या मन:शांतीसाठी राजाने बंधुलचा भाचा दीर्घकारायणला सेनापती केले.

एकदा राजा सेनापतीसह भगवानांच्या दर्शनाला गेला. तिथे जाण्यापूर्वी राजाने पाच राज चिन्हे सेनापती दीर्घकारायणकडे सोपवली. सेनापतीने त्या राजचिन्हांना राजाचा मुलगा, विटटूभच्या हवाली करुन त्याला राजा म्हणून घोषित केले. भगवानांचे दर्शन घेतल्यानंतर जेव्हा राजा बाहेर आला, तेव्हा एक घोडा आणि एक स्त्री पाहून सारे काही जाणून गेला. तो आपला भाचा अजातशत्रुची मदत घेण्यासाठी राजगीरकडे निघाला. नगरात पोहचण्यापूर्वीच नगराचे द्वार बंद झाले होते. तो एका धर्मशाळेत थांबला. दिवसभराच्या कष्टाने आणि दगदगीने तिथेच त्याचा मृत्यू झाला. त्याच्या नावाने रडण्यासाठी फक्त तीच एक महिला होती. त्याची ही गती, त्याच्या स्वत:च्याच कर्मांचे फळ होते.

विपश्यना विशोधन विन्यास